**नाशिक महानगरपालिका ,नाशिक**
**महिला व बालकल्याण विभाग**
**ई कोटेशन नोटीस सुचना**

**कामाचे नाव :-** वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमाकरीता चहा,दुध,पाणी,नाश्ता व भोजन व्यवस्था करणेबाबत.

नाशिक महानगरपालिकेतर्फे वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमाकरीता उत्तम दर्जाचे चहा,दुध,पाणी,नाश्ता व भोजन व्यवस्था करणेकरीता सर्व करांसह कोटेशन व्दारे अधिकृत वितरक, विक्रेते यांचेकडुन कोटेशन पध्दतीने खालील प्रमाणे वस्तु दर मागविण्यात येत आहे.

| अ.न. | तपशिल | वर्णन | व्यक्ती संख्या (अंदाजित) |
|---|---|---|---|
| १) | उपस्थितांसाठी नाश्ता व्यवस्था | चहा, दुध, पुणेरी उपमा, मिनरल वॉटर जार<br>(सर्व उपस्थितांना मागणीनुसार पुरेशा प्रमाणात) | १५५० |
| २) | उपस्थितांसाठी भोजन व्यवस्था | मटकी वटाणा उसळ, ब्राम्हणी बटाटा भाजी, साधी पुरी, प्रसादी शिरा (देशी घी), साधा भात, दाल फ्राय, नागली पापड, कोशिंबीर, ठेचा, मिनरल वॉटर जार<br>(सर्व उपस्थितांना मागणीनुसार पुरेशा प्रमाणात) | १५५० |
| | | | |

**अटीशर्ती**

१. वरील कामाचे कोटेशन पत्रक अटीशर्ती सह www.nmc.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २९/०२/२०२४ ते दिनांक ०५/०३/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजेपावेतो उपलब्ध आहे.
२. कोटेशन पाकीट सादर करणेची अंतिम तारीख दि. ०५/०३/२०२४ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त होणारी कोटेशन पाकीटे स्विकारली जाणार नाही.
३. कोटेशन पाकीट महिला व बालकल्याण विभाग राजीव गांधी भवन शरणपुर रोड नाशिक येथे स्विकारण्यात येतील.
४. चहा,दुध,पाणी,नाश्ता व भोजन व्यवस्था करणेकरीता लागणारे संपुर्ण मनुष्यबळ व चटई (बैठक व्यवस्था), आवश्यक भांडी (ताट, ग्लास, वाटी इ.) निवडलेल्या कोटेशनधारकास पुरवावे लागेल. त्यासाठी पुरेश्या मनुष्यबळाची व्यवस्था कोटेशनधारकाने करावी. त्यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च देय राहणार नाही. तसेच सदरच्या कामाकरीता वेगळा वाहतूक खर्च देण्यात येणार नाही.
५. सदरचे दरपत्रक हे सर्व करासह अनुषंगीक खर्चासह दर नमुद करायचे आहे. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.
६. कोटेशनधारक/एजन्सी ही नाशिक मनपा हददीतील असणे आवश्यक आहे. त्यासाठी शॉप ॲक्ट लायसन्स् /GSTनोंदणी प्रमाणपत्रावरील पत्ता विचारात घेण्यात येईल.
७. कोटेशन धारकाने दोन लिफाफे देणे आवश्यक आहे. १) तांत्रिक लिफाफा या लिफाफ्यात पॅनकार्ड, शॉप ॲक्ट लायसन्स, GST नोंदणी प्रमाणपत्र, फुड ॲण्ड ड्रग्ज लाईसन्स जोडणे आवश्यक आहे. त्या शिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही. तांत्रिक लिफाफा पात्र असल्यावरच वित्तिय लिफाफा उघडण्यात येईल.
८. वित्तिय लिफाफा---- दर पत्रक आवश्यक
९. निवडण्यात आलेल्या कोटेशन धारकास र.रु. १८,८००/- (प्राकलनाच्या एकूण रक्कमेच्या ) ५% सुरक्षा अनामत भरावी लागेल.
१०. कोटेशन स्विकारणे / नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.
११. नाशिक महानगरपालिकेस पुढील सहा महिन्याच्या कालावधीत वरीलप्रमाणे चहा,दुध,पाणी,नाश्ता व भोजन व्यवस्था आवश्यकता भासल्यास मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक राहील.

**Sd/-**
**उप आयुक्त (समाज कल्याण)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महिला व बालकल्याण विभाग
## ई कोटेशन सुचना

**कामाचे नाव :-** वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमाकरीता चहा,दुध,पाणी,नाश्ता व भोजन व्यवस्था करणेबाबत.

### सर्व साधारण अटी -शर्ती

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद कामाचे स्वरुप हे अंदाजे असुन त्यामध्ये कामाचे अनुषंगाने कमी जास्त होण्याची शक्यता आहे. अंदाजित संख्येपेक्षा अधिक चहा,दुध,पाणी,नाश्ता व भोजन आवश्यक असल्यास त्याप्रमाणे त्याच दराने पुरवठा करणे बंधनकारक राहील तसेच अंदाजित संख्येपेक्षा कमी चहा,दुध,पाणी,नाश्ता व भोजन आवश्यक असल्यास तेवढयाच प्रमाणात देयक अदा करण्यात येईल.

३) दिलेल्या मुदतीमध्ये वेळेवर संपुर्ण काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे. कोटेशनमधील स्पेसिफिकेशननुसार व उपस्थितांच्या मागणीनुसार पुरेश्या प्रमाणात अन्न पुरवठा करणे बंधनकारक राहील.

४) ज्यांचे कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र. रु. ५२०/- चे जनरल स्टँपपेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

५) जी.एस.टी करासह व अनुषंगीक खर्चासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

६) मुदतीत काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास/ योग्य दर्जाचा व पुरेश्या प्रमाणात अन्न पुरवठा न केल्यास महानगरपालिकेचे झालेले नुकसान विचारात घेऊन दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल. खाण्या योग्य उत्तम दर्जाचा अन्न पुरवठा न केल्यास तो नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांना राहील. निकृष्ट दर्जाचा अन्न पुरवठा केल्याने दुष्पपरिणाम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादार याची राहील व तो कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार कामकरणे/सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

८) मुदतीत काम न झाल्यास/ /सेवा न पुरविल्यास /मुदतीत काम पुर्ण न केल्यास,सदरचे काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

९) मंजुरीनुसार काम न झाल्यास / सेवा न पुरविल्यास,काम/ सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

१०) कोणतेही काम मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही. याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही.

११) अटी /शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१२) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या कामाच्या दरात/सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही .

१३) अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१४) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

१५) GST नोंदणी प्रमाणपत्र शॉप ॲक्ट लायसन्स्, पॅन कार्ड, फुड लायसन्स इ. कागद पत्रे स्व् साक्षंकित करुन कोटेशन सोबत जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोटेशन विचारात घेतले जाणार नाही.

Sd/-
उप आयुक्त (समाजकल्याण)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

# नाशिक महानगरपालिका,नाशिक
# महिला व बालकल्याण विभाग
# कोटेशन फॉर्म दरपत्रक

**कामाचे नाव:-** वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमाकरीता चहा,दुध,पाणी,नाश्ता व भोजन व्यवस्था करणेबाबत.

कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत :- दि. ०५/०३/२०२४ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत

कोटेशनधारकाचे नाव व पत्ता :- ---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------

संपर्क क्रमांक (मोबाईल क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक) :--------------------------------------

उक्त प्रमाणे कामाचे अटीशर्ती नुसार वंचित बालक मेळावा दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमाकरीता उत्तम दर्जाचे चहा,दुध,पाणी,नाश्ता व भोजन व्यवस्था करणेकरीता सर्व करांसह कोटेशन व्दारे अधिकृत वितरक, विक्रेते यांचेकडुन कोटेशन पध्दतीने खालील प्रमाणे वस्तु दर मागविण्यात येत आहे.

| **अ.न** | **तपशिल** | **वर्णन** | **मागणी नग संख्या अंदाजित** | **प्रती व्यक्ती दर (सर्व करांसह)** | **एकुण रक्कम (सर्व करांसह)** |
|---|---|---|---|---|---|
| १) | उपस्थितांसाठी नाश्ता व्यवस्था (उत्तम दर्जा) | चहा, दुध, पुणेरी उपमा, मिनरल वॉटर जार<br><br>(सर्व उपस्थितांना मागणीनुसार पुरेशा प्रमाणात) | १५५० | | |
| २) | उपस्थितांसाठी भोजन व्यवस्था (उत्तम दर्जा) | मटकी वटाणा उसळ, ब्राम्हणी बटाटा भाजी, साधी पुरी, प्रसादी शिरा (देशी घी), साधा भात, दाल फ्राय, नागली पापड, कोशिंबीर, ठेचा, मिनरल वॉटर जार<br><br>(सर्व उपस्थितांना मागणीनुसार पुरेशा प्रमाणात) | १५५० | | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटी शर्ती मी वाचल्या असुन मला त्या मान्य आहेत. सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने उक्त वस्तु व सेवा पुरविणे / पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे .

दिनांक:-

ठिकाण:-

कोटेशन धारकाची सही व शिक्का